# राष्ट्रीय सेवा योजना- युवाकांसाठी कृतिशील उपक्रम

शोधपत्र-वाणिज्य

*प्रा. सुरेश आर. वराडे

**आज देशातील १८० विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या ८ हजार महाविद्यालयांतून राष्ट्रीय सेवा योजना राबविली जाते. महाविद्यालयीन तरूणांच्या सेवावृत्तीतून सर्वांगीण विकास होवून ही योजना आज अतिशय परिणामकारक आणि लोकोपयोगी ठरली आहे. त्यानिमित्त प्रा.एस.आर.वराडे यांनी राष्ट्रीय सेवायोजना दिनाविषयी घेतलेला आढावा. युवकांना कार्यप्रवण करून त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी व्यासपीठ निर्माण करण्याचे कार्य महाविद्यालायीन तसेच विद्यापीठस्तरावर कार्यरत असलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेने केले आहे. आज या योजनेला ४० वर्ष पूर्ण होत**



**आहेत. त्यानिमित्त... आज २४ सप्टेंबर म्हणजे राष्ट्रीय सेवा योजनेचा दिवस २४ सप्टेंबर १९६९ च्या महात्मा गांधी शताब्दी आणि चौथी पंचवार्षिक योजनेनुसार महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना सामाजिक कार्याची समाजातील समस्यांची जाणीव व्हावी, संकटात, नैसर्गिक आपत्तीत धाडसाने तोंड देता यावे, स्वतःच्या व्यक्तीमत्वाचा विकास करणे, जनप्रबोधन आणि समाजजागृती करणे, आणि समाजातील एक चांगले नागरिक निर्माण करणे, महाविद्यालयातील या युवा शक्तीस विधायक कार्याकडे वळविणे, राष्ट्र उभारणीत या युवा शक्तीचा आणि युवकांचा सहभाग वाढविणे या हेतूने सुरु करण्यात आलेल्या 'राष्ट्रीय सेवा योजने' चा आज ४० वा स्थापना दिवस अल्पावधीत विद्यार्थिप्रिय झालेल्या या योजनेचा विचार करून त्यात आज राज्यभरातून १०,००,००० लाख विद्यार्थी – विद्यार्थिनी सहभागी झालेले आहेत. असे असले तरी या योजनेबद्दल समाजात आणि विशेषतः विद्यार्थिनी व त्यांच्या पालकांमध्ये गैरसमज आहेत. ते नाहिसे व्हावे म्हणून या राष्ट्रीय सेवा योजनेबद्दलची ही माहिती.**

''माझ्यासाठी नव्हे, तर तुमच्यासाठी'' हे राष्ट्रीय सेवायोजनेचे बोधवाक्यच आपल्याला रा.से.यो. च्या स्वयंसेवकांमध्ये जोपासल्या जाणाऱ्या सेवावृत्तीची आठवण करून देते. समाजाच्या विकासासंदर्भात कार्य करीत असतांना सामाजिक बांधीलकी, लोकशाही, सहानुभूती व सहकार्य, इतरांच्या विचारांचा आदर इ. मुल्ये जोपासण्याची प्रेरणा राष्ट्रीय सेवा योजनेच्या या बोधवाक्यातून मिळते. युवकांच्या हातून राष्ट्रसेवा घडावी या हेतूने २४ सप्टें.१९६९ मध्ये महात्मा गांधी जन्मशताब्दी वर्षात राष्ट्रीय सेवा योजनेचा जन्म झाला. सुरुवातीला ही एक चळवळ असल्याने हा कार्यक्रम प्रथम १९६९ ते १९७४ या पाच वर्षासाठी होता. त्या काळात ही चळवळ कमालीची यशस्वी ठरली होती. प्रत्येक महाविद्यालयीन युवकांमध्ये ती अतिशय लोकप्रिय ठरु लागली. त्यामुळे ती पुढे नियमित सुरु ठेवणे भाग पडले, आणि त्यामुळेच आपण आज २४ सप्टेंबरला ''राष्ट्रीय सेवा योजना'' दिवस साजरा करीत आहोत. राष्ट्रीय सेवा करण्याची त्याच बरोबर स्वतःच्या कलागुणांचा विकास होण्यासाठी व्यक्तीमत्व विकास होण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला ''व्यासपीठ'' आवश्यक असते. असे व्यासपीठ युवकांना मिळावे, त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा राष्ट्रसेवेची प्रेरणा मिळावी या हेतूने राष्ट्रीय सेवा योजनेची स्थापना करण्यात आली. महाविद्यालयीन विद्यार्थी शिक्षण घेत असतांना त्यांच्या डोळ्या समोर सवोच्च सामाजिक जबाबदारीची जाणिव असावी शिक्षण काळात केवळ बौध्दिक विकास एवढेच ध्येय विद्यार्थ्यांपुढे नसावे, शैक्षणिक कालावधीतच भावी आयुष्याची जडणघडण त्यांना करायची असते, असे विचार महात्मा गांधी नेहमीच आपल्या भाषणात विद्यार्थी वर्गापुढे ठेवत असत. या विचारांच्या पुर्ततेसाठी आणि चौथ्या पंचवार्षिक, योजनेनुसार (१९६९ ते ७४) सामाजिक कार्यासाठी ही योजना (एन.एस.एस.) सुरु करण्यात आली. ही योजना मानव संसाधन विभाग मंत्रालय, युवक कल्याण व क्रिडा विभाग आणि भारत सरकार

* वाणिज्य विभाग, कला व वाणिज्य महाविद्यालय, बोदवड, जि. जळगांव [ महाराष्ट्र ]

यांच्या सहकार्याने भारतातील सर्व विद्यापीठ आणि विद्यापीठ कार्यक्षेत्रातील वरिष्ठ महाविद्यालयात २४ सप्टेंबर १९६९ रोजी सुरु केली आहे. त्यानुसार राज्यातून एकंदरीत ३७ विद्यापीठात ही योजना राबविली जात आहे. ही योजना राबवितांना विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर लक्ष केंद्रीत करून समाजसेवा साधण्याचा प्रयत्न केला गेला आहे.

**<u>राष्ट्रीय सेवा योजनेची उदिष्ट्ये –</u>** महाविद्यालयातील तरुणांच्या शक्तीचा वापर समाजोपयोगी व लोकजागृतीच्या कामासाठी करीत असतांनाच त्यांच्यामध्ये नेतृत्व गुण, लोकशाही प्रवृत्तीचा विकास, तो घेत असलेल्या ज्ञानाचा व्यावहारिक प्रश्न सोडविण्यासाठी उपयोग करणे, आपात्कालीन परिस्थितीमध्ये मदतकार्यात सहभागी होणे, ही या योजनेच्या उद्दिष्टांपैकी काही प्रमुख उद्दिष्ट्ये आहेत. स्वातंत्र्याचा सुवर्णमहोत्सव साजरा केल्यानंतर नवीन सहस्त्रकात प्रवेश करतांना जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी ''श्रम एवं जयते'' च्या बलावर नवभारताच्या निर्मितीचे उद्दिष्ट्ये राष्ट्रीय सेवा योजनेने ठेवलेले आहे. नविन राष्ट्राची निर्मिती करीत असतांना ग्रामीण भागात राहणाऱ्या लोकांची सेवा आणि रक्षा करण्याचे उद्दीष्ट्ये राष्ट्रीय सेवा योजनेचय माध्यमातून प्रत्येक वर्षी कमीत कमी एका गावाची दहा दिवस सेवा करण्याचे उद्दिष्ट्ये ठेवले जाते. अशा प्रकारची सेवा करण्याची दहा दिवसांचे शिबीर घेण्याचे उपयुक्त माध्यम राष्ट्रीय सेवा योजनेने ठरविले आहे. या दहा दिवसांच्या शिबीरात गावाच्या सेवेच्या माध्यमातून विकास घडविण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजना करीत असतांना या शिबीरातून उत्कृष्ट स्वयंसेवक निर्माण व्हावेत हीच या योजनेची अपेक्षा असते. राष्ट्रीय सेवा योजनेच्या दहा दिवसांच्या शिबिरात प्रामुख्याने युवकांचा व्यक्तीमत्व विकास व्हावा, त्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांना चालना मिळावी, त्या युवकांमधून स्वयंसेवक निर्माण व्हावेत यासाठी बौध्दिक व्याख्याने आयोजित केली जातात. गटचर्चेच्या माध्यमातून आपले विचार इतरांना सांगण्याची संधी दिली जाते. श्रमदानाच्या माध्यमातून 'घेवून कुदळ खोर, चल जाऊ म्होर, देऊ देशाला जीवदान' या गीताप्रमाणे घामामधून कामामधून सोन्याचे रान पिकविण्याचे कार्य राष्ट्रीय सेवा योजना करते. जंगली लाकडाच्या तस्करीपासून भरपूर पैसा मिळत असल्याने अरण्ये भकास झाली असतांना राष्ट्रीय सेवा योजना मात्र '' जंगल भी है देश की दौलत आओ पेड लगाये हम'' चा संदेश देत आहे. त्याच बरोबर निरक्षरांना शिकविण्याचा संदेशही योजना देते.

४० वर्षाच्या गौरवशाली पंरपरेत राष्ट्रीय सेवा योजना नेहरू, आझाद यांचे विचार लोकांपर्यत पोहचविण्याचे कार्य करीत आहे. महात्मा गांधीची सर्व स्वप्ने पूर्ण करून त्यांच्या स्वप्नातील भारत निर्माण करण्याचे ध्येय राष्ट्रीय सेवा योजनेने ठेवले आहे. महात्मा गांधी विचार परिसंवाद, तीन दिवसीय मैत्री शिबीर, साने गुरुजी जन्मशताब्दी अभियान श्रमसंस्कार केंद्र, मानवता जागरण पदयात्रा, पालघर हे अमळनेर दरम्यान सायकलयात्रा असे विद्यापीठ स्तरावर कार्यक्रम आयोजित करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेने जो पुढाकार घेतला तो वाखाणण्याजोगा आहे. समाज सेवेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या ''व्यक्तिमत्व विकास'' हा राष्टीय सेवा योजनेचा उद्देश साधण्यासाठी -१) विद्यार्थी ज्या समाजात राहतो, वावरतो, त्या समाजास त्याने समजावून घेतले पाहिजे. २) समाजाच्या संदर्भातील स्वतःचे आत्मपरिक्षण करण्याचे सामर्थ्य विद्यार्थ्यात आले पाहिजे. ३) समाजाच्या गरजांची, त्यांच्या समस्यांची ओळख विद्यार्थ्यास झाली पाहिजे व त्यांची सोडवणुक करण्यासाठी तो सक्रीय झाला पाहिजे. ४) स्वतःमध्ये सामाजिक व नागरिकीय जबाबदाऱ्यांची जाणीव व विकास झाला पाहिजे. ५) शिक्षणाचा उपयोग प्रत्यक्षात व्यक्तिगत व सामाजिक प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी त्याने प्रयत्न करावा आणि तशी मानसिक व शारिरीक क्षमता त्यांच्यात असावी. ६) समुहात राहण्यासाठी व भिन्नभिन्न जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी ज्या गुणांची गरज आहे. त्यांचा विकास विद्यार्थ्यामध्ये विकसित व्हावा. ७) सामाजिक सहभागात गतिमान राहण्याचे कौशल्य त्याने आत्मसात करावे. ८) नेतृत्वाचे गुण त्यांच्यात आले पाहिजे व त्यांचा विकास अखंडितपणे झाला पाहिजे. ९) लोकशाही प्रवृत्तीचा त्याच्यात विकास झाला पाहिजे. १०) संकट काळात, नैसर्गिक आपत्तींना धैर्याने तोंड देण्याची क्षमतांचा त्यांच्यात विकास झाला पाहिजे. ११) बंधूभाव, सहकार्य, नम्रता, आदर, राष्ट्रीय एकता ही ध्येय यातून सफल व्हावीत. वरील सर्व उद्दिष्टचे डोळ्यासमोर ठेवूनच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय पातळीवर राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमांची आखणी करण्यात आली आहे.

रा.से. योजनेचे चिन्ह व बिल्लादेखील याच उद्दिष्टांना प्रदर्शित



करतात. यातील लाल रंग तरूणांच्या उसळत्या रक्ताचे, चैतन्याचे प्रतीक आहे, तर चिन्हांच्या बाहेरील बाजूने असणारा निळा रंग आकाशाचे प्रतिनिधीत्व करतो व ही योजना म्हणजे या अथांग अशा आकाशाचा एक छोटासा अंश असल्याची, अर्थात स्वयंसेवकाने आपल्या अंगी सेवाभाव व नम्रपणा जोपासण्याची आठवण करून देतो. यामध्ये असलेल्या चक्राचे आठ आरे अष्ठोप्रहर अर्थात २४ तासांचे प्रतिनिधीत्व करतात व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक सर्देव तत्पर असल्याचे दर्शवितात.

लोकशाही पध्दतीने राहण्याचे सुत्र व निस्वार्थी सेवेचे व्रत Not me but you ''माझ्यासाठी नव्हे तुमच्यासाठी '' असे घोषवाक्य निवडून घेतले आहे.

प्रत्यक्ष अंमलबजावणी करतांना या योजने मार्फत नियमित कार्यक्रम व दहादिवशीय विशेष शिबिरांचे कार्यक्रम आयोजित केले जातात. नियमित कार्यक्रमांतर्गत मुख्यत्वे करून महाविद्यालय पातळीवर विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, संघटन शक्ती, श्रममहिला, सेवाभाव, वक्तृत्व कला, कार्यकुशलता व निपुणता इ. गुण विकसित करण्याच्या उद्देशाने १५ ऑगष्ट, २६ जानेवारी यासारखे राष्ट्रीय उत्सव, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा महापरिनिर्वाण दिन, साक्षरतादिन, जागतिक एडस्‌दिन, सद्‌भावनादिन, यासारखे राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय दिन, राष्ट्रीय एकात्मता सप्ताह, लोकजागृतीसाठी पल्स पोलिओ लसिकरण मोहिममध्ये सहभाग, एडस्‌ जनजागरण मोहीम, सामाजिक ऐक्य पंधरवाडा गणपती उत्सवाच्या काळात निर्माल्य संकलनासारखे कार्यक्रम, व्यसनमुक्ती अभियान, रक्तदान शिबिरे इ. कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. प्रत्येक वर्षी देण्यात आलेल्या उद्दिष्टांना अनुसरून वृक्षारोपन, आरोग्य शिबिरे, जल संधारणाची माहिती देणे इ. कार्यक्रम घेतले जातात. राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यार्थी हा स्वतःच्या हिताबरोबर देशाचे हितही बघतो आणि म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांबद्दल समाजात काम करतांना तक्रार आढळत नाही. समाजसेवा करता करता तो स्वतःला घडवित असतो, आणि या देशात एक चांगला आदर्श नागरिक म्हणून घेण्यास पात्र ठरतो. हे ''विश्वची माझे घर'' आम्ही एक आहोत, आमची मानवता हिच जात, मानवता हाच धर्म आहे. हे तो राष्ट्रीय सेवा योजनेतून शिकून प्रत्यक्ष कृतीतून दाखवितो. विद्यार्थ्यांमध्ये उत्साह निर्माण करण्यासाठी ज्या कार्यक्रमांची आवश्यकता असते अशा प्रकारचे कार्यक्रम राष्ट्रीय सेवा योजना आयोजित करते. विद्यापीठाच्या युवक महोत्सवात जे विविध कार्यक्रम होत असतात त्यामध्ये जास्तीत जास्त विद्यार्थ्यांचा सहभाग असावा त्यांनी प्रत्यक्ष व्यासपीठावर यावे यासाठी राष्ट्रीय सेवा योजना नेहमी प्रयत्नशिल असते. मानव हा समाजप्रिय प्राणी आहे. तो समाजातच जन्माला येतो, समाजातच जगतो, समाजाकडून शिकतो आणि समाजाला काही देणे देवून समाजातच मरतो. म्हणून प्रत्येक व्यक्तीने या समाजाची पूर्ण ओळख करून घ्यावी. त्यासाठी महाविद्यालयातील शासनाच्या या राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी व्हावे. कारण समाजसेवा करण्याची आणि आपले व्यक्तीमत्व घडविण्याची, अनुभव घेण्याची स्वतःवर सुसंस्कार करवून घेण्याची आणि या भारतातले एक आदर्श नागरिक होण्याची संधी मिळवावी. कारण या समाजातीलच आपण एक घटक आहे. त्यामुळे या समाजाची सेवा म्हणजे राष्ट्रीय सेवा होय. म्हणून या योजनेचे नाव ''राष्ट्रीय सेवा योजना '' असे सार्थ ठेवले आहे, आणि हे सार्थनाव या योजनेतील सहभागी विद्यार्थी, यातील प्राध्यापक वर्ग, विद्यापीठ हे कृतीतून सार्थ करीत आहे. अनेक विद्यार्थी या योजनेतून शिकून विविध क्षेत्रात विशेषतः सहकारी क्षेत्रात मोठमोठ्या पदांवर आजही कार्य करीत आहे. आणि म्हणूनच एक आदर्श नागरिक तयार करणारी योजना म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेकडे पाहिजे जाते.

## सन्दर्भ ग्रन्थ

१) राष्ट्रीय सेवा योजना (तत्व, व्यवहार आणि उपयोजन) २) तरूण भारत दि. २४ सप्टेंबर १९९९ ३) लोकमत दि.२३ सप्टेंबर २००० ४) लोकमत दि.२४ सप्टेंबर २००५ ५) व्हॉलेटिअरर्स वर्क्स डायरी